28-01-2025-Dai-01_DH_PAN_01_04_2016-1.qxp 01/27/2025 11:44 PM Page 1



विकास योजनांना आमचा विरोध नाही » पान ३ वर

आपलं, आपल्यासाठी, सर्वांसाठी

# दैनिक हेराल्ड

www.dainikherald.com



बुमराह २०२४चा आयसीसी सर्वोत्कृष्ट कसोटी क्रिकेटपटू » पान ४ वर

वेर्णा, मंगळवार, २८ जानेवारी २०२५ | पाने ४ | ₹ ४

| REG. NO. G2/RNP/GOA/101/2021-23 | Volume 13, Issue 146 | Verna, | facebook.com/dainikherald | Tuesday 28 January 2025 | Pages 4 | ₹ 4

## निवडक

### वक्फ विधेयकातील बदलांना मंजुरी

नवी दिल्ली, दि. २७ : वक्फ विधेयकातील बदलांना संसदेच्या संयुक्त समितीने सोमवारी मंजुरी दिली. गेल्या वर्षी ऑगस्टमध्ये १४ बदलांसह हे विधेयक संसदेत मांडण्यात आले होते. यापूर्वी भाजप खासदार जगदंबिका पाल यांनी ४४ बदलांचा प्रस्ताव ठेवला होता, तो विरोधी सदस्यांनी फेटाळला होता. वक्फ (दुरुस्ती) विधेयकावरील संयुक्त संसदीय समिती आपला अहवाल अर्थसंकल्पीय अधिवेशनादरम्यान सादर करणार आहे. संसदेच्या हिवाळी अधिवेशनात समितीचा कार्यकाळ वाढवण्यात आला होता. वक्फ मालमत्ता नियमित करण्याच्या उद्देशाने वक्फ कायदा १९९५, चुकीचे व्यवस्थापन, भ्रष्टाचार आणि अतिक्रमण यासारख्या मुद्द्यांसाठी टीका केली गेली आहे. जेपीसीचे अध्यक्ष जगदंबिका पाल यांनी बैठकीनंतर सांगितले की, समितीने स्वीकारलेल्या सुधारणांमुळे कायदा अधिक चांगला आणि प्रभावी होईल. मात्र, विरोधी खासदारांनी सभेच्या कामकाजाचा निषेध करत पाल यांच्यावर लोकशाही प्रक्रिया उद्धवस्त केल्याचा आरोप केला.

---

### सिद्धरामय्या यांच्या पत्नीला ईडीची नोटीस

बंगळुरू, दि. २७ : कर्नाटक उच्च न्यायालयाने मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांच्या पत्नी पार्वती यांना पाठवलेल्या ईडीच्या नोटीसला स्थगिती दिली आहे. म्हैसूर अर्बन डेव्हलपमेंट अथॉरिटी जमीन घोटाळ्याप्रकरणी ईडीने पार्वती यांना नोटीस बजावली होती. पुरावे आणि रेकॉर्ड सादर करण्यासाठी त्यांना २८ जानेवारी रोजी सकाळी ११ वाजता ईडीच्या बंगळुरू कार्यालयात बोलावण्यात आले. पार्वती आणि मंत्री भारती सुरेश यांनी ईडीच्या नोटिशीच्या विरोधात उच्च न्यायालयात अपील केले होते. न्यायमूर्ती नागप्रसन्ना यांनी १० फेब्रुवारीला होणाऱ्या पुढील सुनावणीपर्यंत ईडीच्या नोटीसला स्थगिती दिली आहे. ईडीचे अतिरिक्त संचालक मुरलीकन्नन यांनी सांगितले की, मनी लॉंडरिंग कायदा २००२ अंतर्गत पार्वतींविरुद्ध तपास सुरू आहे. वास्तविक, मुडावर अनेकांना कमी किमतीत मालमत्ता दिल्याचा आरोप आहे. यामध्ये म्हैसूरमधील पॉश भागात पार्वती यांना दिलेल्या १४ साइट्सचाही समावेश आहे. म्हैसूरच्या कसाबा होबळी येथील कसारे गावातील ३.१६ एकर जमिनीच्या बदल्यात ही जागा देण्यात आली होती. ३ लाख २४ हजार ७०० रुपयांना १४ जागा देण्यात आल्या. मात्र, या ३.१६ एकर जमिनीवर पार्वतींचा कोणताही कायदेशीर हक्क नव्हता. ही जमीन पार्वतींचा भाऊ मल्लिकार्जुन यांना २०१० मध्ये भेट म्हणून देण्यात आली होती.

---

### राहुल गांधी अडचणीत येणार ?

कोलकाता, दि. २७ : नेताजी बोस यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी कॉंग्रेस नेता आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी ट्वीट केलेल्या पोस्टरवरून ते चांगलेच अडचणीत आल्याचे दिसते आहे. या प्रकरणी राहुल गांधी यांच्यावर आणखी एक गुन्हा दाखल झाला आहे. या प्रकरणावरून पश्चिम बंगालमधील राजकारण चांगलेच तापले आहे. नेताजी सुभाष चंद्र बोस यांच्या जयंती निमित्त
२३ जानेवारी रोजी त्यांना आदरांजली म्हणून राहुल गांधी यांनी एक पोस्ट केली होती. या पोस्टमुळे ते वादात सापडले आहेत. यावरूनच त्यांच्याविरोधात एफआयआर दाखल करण्यात आला आहे. दक्षिण कोलकात्यातील भवानीपूर ठाण्यात हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### हवामान

कमाल : २८ किमान : २३
आर्द्रता : ७५

### बाजार भाव

सोने : ₹ ७१,७८० (१० ग्रॅम)
चांदी : ₹ ८५,१०० (१ किलो)

### शेअर मार्केट

सेन्सेक्स : ८२,३६५.७७ ↑ (२३१.१६)
निफ्टी : २५,२३५.९० ↑ (८३.९५)

# खाणीविरोधात मुळगाव रहिवाशांची आक्रमक एकजूट!

## खाण कंपनीच्या अधिकाऱ्यांसोबत झालेल्या बैठकीत कोणताही तोडगा नाही | ट्रकचालकही आंदोलनात सहभागी

■ टीम दैनिक हेराल्ड :

**डिचोली, दि. २७ : सततच्या असह्य धूळ आणि ध्वनीप्रदुषणामुळे रविवारी आक्रमक झालेल्या मुळगाव गावातील नागरिकांनी वेदांतच्या डिचोली ब्लॉक -१ मधील खाणीवर धडक देवून कामकाज बंद केल्यानंतर सोमवारी खाण अधिकाऱ्यांसोबत झालेल्या बैठकीत मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित राहिले . मात्र या बैठकीत कोणताही तोडगा निघू शकला नाही. नागरिकांनी खाणीला जोरदार विरोध दर्शविला. यावेळी वेदांत कंपनीचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी धीरजकुमार जगदीश तसेच संतोष मांद्रेकर उपस्थित होते.वेदांतने असा युक्तिवाद केला की समुदायाने उपस्थित केलेल्या मुद्द्यांवर काळजीपूर्वक विचार केला जात आहे.**



आमचा गाव लिझ क्षेत्रातून बाहेर काढा तसेच बफर झोनचे सिमांकन व खाणीमुळे शेतीची झालेली हानी व नुकसान भरपाई अशा एकूण १५ मागण्या पुन्हा एकदा अधिकाऱ्यांसमोर ग्रामस्थांनी मांडल्या मात्र करार क्षेत्राचे सिमांकन हे सरकारतर्फे केले जाते त्यात कंपनी हस्तक्षेप करू शकत नसल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितल्यानंतर ग्रामस्थांनी त्यांना कोर्टाच्या माध्यमातून लेखी स्वरूपात या मागण्या पूर्ण करणार असे लिहून देण्याचे सांगितले, तो पर्यंत खाणीवर कुठल्याही प्रकारचे कामकाज सुरू करू नका असे बजावले.अधिकाऱ्यांनी आपली बाजू ग्रामस्थांपुढे मांडली.

ग्रामस्थांनी केलेल्या मागण्यांमध्ये प्राधान्याने शेतातील गाळ काढून टाकणे, २०११ पासून शेतकऱ्यांना प्रलंबित भरपाई देणे तसेच डिचोली खाण ब्लॉकमधील २.२१ लाख चौरस मीटर जमिनीसाठी मुळगावच्या कोमुनिदादला भाडेपट्टा भाडे थकबाकी देणे या प्रमुख मागण्यांचा समावेश आहे. वेदांताच्या अधिकाऱ्यांनी गावकऱ्यांना २०१८ पर्यंतची भरपाई दिली जाईल असे सांगितले आणि अतिरिक्त समस्यांवर चर्चा करण्याची तयारी दर्शविली. तथापि, वसंत गड यांच्यासह ग्रामस्थांनी स्पष्ट आश्वासनांच्या अभावाबद्दल असमाधान व्यक्त केले. कंपनीच्या प्रतिनिधींनी 'हो' किंवा 'नाही' असे उत्तर दिले नाही, ज्यामुळे बैठक अनिर्णीत राहिली, असे गड म्हणाले.

त्यानंतरच्या प्रेस निवेदनात, वेदांतने आश्वासन दिले की ते समस्या सोडवण्यासाठी सक्रियपणे काम करत आहेत. आम्ही संबंधित संस्थांना विनंती करतो की आम्ही या प्रकरणाचा निकाल लावण्यासाठी आम्ही मागितलेल्या दीर्घकाळापासून प्रलंबित तपशीलांची माहिती द्यावी, असे कंपनीने म्हटले आहे.

दरम्यान, डिचोलीतील ट्रकचालकांनी वेदांताच्या कंत्राटदारांमार्फत खनिज वाहतुकीसाठी वाहने आउटसोर्स करण्याच्या निर्णयाविरुद्ध निषेध नोंदवल्यामुळे खाण व्यवस्थापनाविरोधातल्या असंतोषात आणखी भर पडली आहे. आउटसोर्स केलेले ट्रक मागे घेण्याची मागणी करत ऑपरेटर्सनी त्यांचे कामकाज थांबवले आणि कंपनीच्या डिचोली गेटवर निदर्शने केली. ट्रक ओनर्स असोसिएशन ऑफ सेसा मायनिंगचे अध्यक्ष राजाराम 'सतीश' गावकर यांनी स्थानिक ट्रकचालकांसमोरील आव्हानांवर प्रकाश टाकला. खाणकाम पुन्हा सुरू झाले असले तरी, आम्हाला दररोज दोन फेऱ्या मारण्यास त्रास होतो. आता कंपनीने १२ चाकी ट्रक आणले आहेत, ज्यामुळे आमच्याकडे कोणतेही काम उरलेले नाही, असे ते म्हणाले.

१८० ट्रक मालकांचा समावेश असलेल्या संघटनेने कंपनीने त्यांची आउटसोर्स केलेली वाहने मागे घेईपर्यंत कामकाज थांबवण्याचा निर्धार केला आहे. आम्ही कंपनीला वाहतुकीसाठी त्यांचे ट्रक वापरू देणार नाही, असा इशारा गावकर यांनी दिला. ही बैठक ग्रामदेवी केळबाई मंदिराच्या मंडपात घेण्यात आली. खाण अधिकाऱ्यांसमवेत सरपंच मानसी कावठणकर व्यासपीठावर उपस्थित होत्या. सरपंचसोबत सर्व ग्रामस्थ ही खाण बंद करण्याच्या भूमिकेवर ठाम आहेत. रात्री अपरात्री खाण काम सुरू केल्यास बंद करण्याची तयारी ग्रामस्थांनी ठेवली आहे.

# उत्तराखंडात समान नागरी कायदा लागू

## युसीसी लागू करणारे बनले देशातील पहिले राज्य

**नवी दिल्ली, दि. २७ :बहुप्रितिक्षित समान नागरी कायदा (युसीसी) अखेर सोमवारी उत्तराखंडमध्ये लागू झाला. हा कायदा लागू करणारे हे पहिले राज्य ठरले आहे. हा कायदा लागू करण्यापूर्वी यावर भरपूर चर्चा झाली होती. अनेकांशी सल्ला मसलतही करण्यात आली होती. विशेष म्हणजे, राज्यातील नागरिकांसोबतही चर्चा करण्यात आली होती. त्यानंतरच उत्तराखंड येथे हा कायदा लागू करण्याचा निर्णय घेण्यात आला. मुख्यमंत्री पुष्कर सिंह धामी यांनी 'यूसीसी'च्या पोर्टल आणि नियमांचे उद्‌घाटन केले.**

**गेल्या वर्षी ७ फेब्रुवारी रोजी उत्तराखंड विधानसभेने समान नागरी कायदा मंजूर केला होता. त्याची अंमलबजावणी आणि नियम तयार करण्यासाठी स्थापन केलेल्या गठित समितीने १८ ऑक्टोबर रोजी आपला अहवाल सादर केला होता. हा कायदा लागू झाल्यानंतर आता राज्यात विवाह, लिव्ह-इन रिलेशनशिप आणि वारसा हक्का संबंधी काही नियम बदलले आहेत.**

**समान नागरी कायदा लागू करण्यासाठी ग्रामीण भागात एसडीएम रजिस्ट्रार आणि ग्रामपंचायत विकास अधिकारी सबरजिस्ट्रार असतील. तर नगर पंचायत, नगर पालिकांमध्ये संबंधित एसडीएम रजिस्ट्रार आणि कार्यकारी अधिकारी सब रजिस्ट्रार असतील. अशाच प्रकारची रचना शहरी भागात असेल.**

**या कायद्यानुसार, विवाहित दाम्पत्याला सहा महिन्यांच्या आत त्यांच्या विवाहाची नोंदणी करणं बंधनकारक असणार आहे. इतकेच नाही तर लिव्ह-इन रिलेशनशिपमध्ये असलेल्या जोडप्यांना कायदा लागू झाल्यानंतर नोंदणी करण्यासाठी एक महिन्याचा कालावधी दिला जाणार आहे. राज्याच्या मुख्यमंत्र्यांचे सचिव शैलेश बगोली**

पान २ ▶

# अमर बांदेकर खुनीहल्ला प्रकरणात महत्त्वाचा ट्विस्ट

## अमरचा मृत्यू 'हार्ट अॅटॅक' मुळे झाल्याचे शवविच्छेदनात उघड

टीम दैनिक हेराल्ड

**पेडणे, दि. २७ :** हरमल किनाऱ्यावर शॅक कामगारांनी मारहाण केलेल्या स्थानिक रहिवासी अमर बांदेकर मृत्यू प्रकरणाला सोमवारी अनपेक्षित वळण मिळाले. अमर बांदेकर यांच्या शवविच्छेदन अहवालात मृत्यूचे कारण हृदयविकार असल्याचे उघड झाले. गोवा वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयातील फॉरेन्सिक तज्ज्ञांनी केलेल्या तपासणीनुसार, अमरचा मृत्यू तीव्र मायोकार्डियल इन्फार्क्शन, ज्याला सामान्यतः हृदयविकाराचा झटका म्हणून ओळखले जाते, तसेच त्याच्या डोक्यावर, चेहऱ्यावर आणि मेंदूवर झालेल्या जखमांमुळे झाला होता, जो हल्ल्याच्या इतिहासाशी सुसंगत आहे.

पोलिसांनी पुष्टी केली आहे की रासायनिक विश्लेषणासाठी व्हिसेरा जतन करण्यात आला आहे आणि हिस्टोपॅथॉलॉजीसाठी हृदय राखून ठेवण्यात आले आहे. त्यामुळे जरी खुनाचा खटला आधीच दाखल करण्यात आला असला तरी शवविच्छेदन अहवालानंतर या प्रकरणाच्या तपासाची दिशा बदलू शकते.

हिमाचल प्रदेशातील कुल्लू येथील रहिवासी सुरेंदर कुमार (३९) याला सोमवारी हल्ल्याच्या संदर्भात अटक करण्यात आली. हरमलमधील सी लाउंज बीच शॅकमध्ये बांदेकर यांची हत्या केल्याचा त्याच्यावर आरोप आहे. आरोपीला पेडणे येथील न्यायिक दंडाधिकारी प्रथम श्रेणी (जेएमएफसी) यांनी सात दिवसांची पोलिस कोठडी सुनावली आहे.



पोलिसांच्या अहवालानुसार, कुमार आणि शॅकमधील इतर कर्मचाऱ्यांनी समुद्रकिनाऱ्यावर खुर्च्या ठेवण्यावरून बांदेकर यांच्याशी जोरदार वाद घातला. परिस्थिती लवकरच चिघळली आणि आरोपीने बांदेकर यांच्यावर चापट, लाथा आणि तीक्ष्ण वस्तूंनी हल्ला केल्याचा आरोप आहे. जखमी अवस्थेतला अमर घटनास्थळावरून पळून जाण्यात यशस्वी झाला, परंतु काही अंतरावर धावल्यानंतर तो कोसळला. त्याला तुये येथील आरोग्य केंद्रात नेण्यात आले, जिथे त्याला मृत घोषित करण्यात आले. मांद्रे पोलिसांनी कलम १०३ आणि बीएनएस २०२३ अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे.

सोमवारी सकाळी मांद्रे पोलिसांसह फॉरेन्सिक तज्ज्ञांनी अधिक तपास करण्यासाठी हरमल बीचला भेट दिली. पेडणे एसडीपीओ आशिष शिरोडकर आणि दक्षिण गोव्याचे पोलिस अधिक्षक राहुल गुप्ता, आयपीएस यांच्या मार्गदर्शनाखाली मांद्रे पोलिस निरीक्षक शेरीफ जॅक यांच्या नेतृत्वाखाली तपास सुरू आहे.

या घटनेवर राजकीय नेत्यांकडून तीव्र प्रतिक्रिया उमटल्या आहेत. कॉंग्रेस उपाध्यक्ष सुनील कवठणकर यांनी गेल्या दोन महिन्यांत समुद्रकिनाऱ्यावरील झोपड्यांमध्ये तीन खून झाल्याचे निदर्शनास आणून देत हिंसक घटनांमध्ये वाढ झाल्याचा निषेध केला. सुरक्षित पर्यटन स्थळ म्हणून गोव्याच्या प्रतिष्ठेवर होणाऱ्या नकारात्मक परिणामाबद्दल त्यांनी चिंता व्यक्त केली. गोव्यात कायदा आणि सुव्यवस्था पूर्णपणे अपयशी ठरली आहे, असे ते म्हणाले.

गोवा फॉरवर्ड पक्षाचे उत्तर गोवा अध्यक्ष दीपक कलंगुटकर यांनीही पर्यटन क्षेत्रात, विशेषतः उत्तर गोव्यात पुरेसे पोलिसिंग सुनिश्चित करण्यात अपयशी ठरल्याबद्दल गृह विभागावर टीका केली. त्यांनी गुन्हेगारी घटनांच्या वाढत्या संख्येवर प्रकाश टाकला आणि शॅक आणि रेस्टॉरंट क्षेत्रात योग्य नियमनाचा अभाव या समस्येला कारणीभूत ठरू शकतो यावर भर दिला.

पर्यटकांनी उत्तर गोव्यात वाढत्या हिंसाचाराबद्दल चिंता व्यक्त केली आहे. बाणावली मधील ब्रिटिश पर्यटक चार्ली स्मिथ म्हणाले, आम्ही वर्षानुवर्षे गोव्याला भेट देत आहोत आणि नेहमीच सुरक्षित वाटलो आहोत. परंतु उत्तर गोव्यात अलिकडच्या काळात झालेल्या हिंसक घटनांमुळे आम्हाला धक्का बसला आहे. हे हल्ले वारंवार होत असल्याचे पाहून आम्हाला धक्का बसला आहे. केळशी येथील आणखी एक युके पर्यटक लिली टेलर यांनी शॅक मध्ये बांबूच्या काठ्यांच्या उपस्थितीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले, ज्याचा वापर पर्यटकांना घाबरवण्यासाठी केला जात असल्याचे सांगितले जात आहे. हे गोव्याची प्रतिष्ठा खराब करत आहे, असे ती म्हणाली.

# शेअर बाजारात प्रचंड निराशा ; गुंतवणूकदारांना कोट्यवधीचे नुकसान

**नवी दिल्ली, दि. २७ :** भारतीय शेअर बाजारात गेल्या काही महिन्यांपासून प्रचंड निराशा दिसून येत आहे. ही निराशा २०२४ च्या ऑक्टोबर महिन्यापासून सुरू झाली. २६ सप्टेंबर २०२४ रोजी सेन्सेक्स ८५,८३६ च्या उंचीवर होता आणि आता परिस्थिती अशी आहे की तो घसरून ७५ हजारांच्या आसपास पोहोचला आहे. यावरून नवीन वर्षात दलाल स्ट्रीट अस्वलाने आपल्या ताब्यात घेतल्याचे दिसते. शेअर्स विकून विदेशी पोर्टफोलिओ गुंतवणूकदारांची म्हणजेच ' एफपीआय' मधून बाहेर पडण्याची प्रक्रिया सुरू आहे.

जानेवारीमध्ये आतापर्यंत, एफपीआय' ने ६९ हजार कोटी रुपयांची विक्री केली आहे, तथापि, देशांतर्गत संस्थात्मक गुंतवणूकदारांनी (म्युच्युअल फंड) याच कालावधीत ६७ हजार कोटी रुपयांची खरेदी करून बाजाराला भरपूर पाठिंबा दिला आहे.

बाजारात चौफेर विक्री होत असली, तरी सर्वात मोठी घसरण लहान आणि



मध्यम समभागांमध्ये (मिडकॅप आणि स्मॉलकॅप) झाली आहे.

सोमवारी व्यापार सत्रात मुंबई शेअर बाजाराचा मिडकॅप निर्देशांक ३ टक्क्यांनी घसरला, तर स्मॉलकॅप निर्देशांक ४ टक्क्यांनी घसरला.बाजार सध्या दोन महत्त्वाच्या घटनांवर लक्ष केंद्रित करत आहे. पहिला, अमेरिकन सेंट्रल बँक फेडरल रिझर्व्हच्या २९ जानेवारीला होणाऱ्या बैठकीत व्याजदरांबाबत काय निर्णय घेतला जातो आणि दुसरा, भारताचा केंद्रीय अर्थसंकल्प १ फेब्रुवारीला संसदेत सादर होणार आहे.

जर फेडरल रिझर्व्हने अमेरिकेत व्याजदर वाढवले तर जगभरातील बाजारांच्या समस्या वाढतील हे निश्चित आहे, तरीही परदेशी गुंतवणूकदारांनी भारतासह अनेक उदयोन्मुख बाजारपेठांना टाळले आहे आणि या परिस्थितीत ते अधिक आणि सुरक्षित परतावा शोधत आहेत. अमेरिका भूमिका घेण्यास विलंब करणार नाही.

तथापि, डीआर चोक्सी फिनसर्व्हचे व्यवस्थापकीय संचालक देवेन चोक्सी यांचे मत आहे की, अमेरिकेत डोनाल्ड ट्रम्प अध्यक्ष झाल्यानंतर फेडरल रिझर्व्ह व्याजदरात वाढ करेल अशी शक्यता फार कमी आहे. बाजार विश्लेषक अंबरिश बालिगा बाजारातील सद्यस्थितीची अनेक कारणे सांगतात.

अंबरीश म्हणतात, भारतातील आर्थिक परिस्थिती काही काळापासून बदलली आहे. केवळ खाजगी संस्थांनीच नाही, तर भारत सरकार आणि रिझर्व्ह बँकेनेही जीडीपी वाढीचा अंदाज कमी केला आहे. अन्नधान्य महागाई दर अजूनही खूप जास्त आहे. तिमाही निकाल कंपन्या येत आहेत. देवेन चोक्सी यांनी बाजारातील या नकारात्मक भावनांसाठी बाजार नियामक संस्था सेबीच्या फ्युचर्स मार्केटशी संबंधित नवीन मार्गदर्शक तत्त्वांनाही जबाबदार धरले. सेबीने अलीकडेच फ्युचर्स आणि ऑप्शन्स ट्रेडिंगसाठी किमान कराराचा आकार १५ लाख रुपयांपर्यंत वाढवला आहे, असे देवेन म्हणाले.

'सेबी'ने नुकताच एक अहवाल प्रसिद्ध केला होता ज्यात दावा करण्यात आला होता की, आर्थिक वर्ष २०२२ ते आर्थिक वर्ष २०२४ या तीन वर्षात एफ अ‍ॅन्ड ओ मध्ये एक कोटीहून अधिक व्यापाऱ्यांचे नुकसान झाले आहे. प्रत्येक व्यापाऱ्याच्या तोट्याबद्दल बोलायचे झाले तर ते सरासरी २ लाख रुपये होते. त्यामुळे १ फेब्रुवारीला सादर होणाऱ्या अर्थसंकल्पाबाबत बाजार आपली दिशा बदलत आहे का ? असा प्रश्न निर्माण होत आहे. अंबरिश बालिगा यांच्या मते गेल्या ८-१० वर्षात अर्थसंकल्प हा घटनाबाह्य झाला आहे. त्यात केलेल्या घोषणांचा प्रभाव फक्त एक-दोन दिवसच राहतो. सरकार वेळोवेळी अनेक धोरणांशी संबंधित घोषणा करत असते. वेळ आणि त्यासाठी बजेटची वाट पाहत नाही, याशिवाय जीएसटीचे दरही वेळोवेळी ठरवले जातात.अंबरीश यांचे म्हणणे आहे की, सरकारने गेल्या अर्थसंकल्पात भांडवली नफा कराबाबत महत्त्वाचा निर्णय घेतला आहे, त्यामुळे त्यात आणखी बदल करण्यास वाव नाही. गेल्या वर्षी म्हणजे २०२४ हे वर्ष भारतीय शेअर बाजारांसाठी खास होते कारण किरकोळ गुंतवणूकदारांनी त्यांचा सहभाग वाढवला. सिस्टिमॅटिक इन्व्हेस्टमेंट प्लॅन द्वारे भरपूर पैसा बाजारात आला आणि शेअर्सच्या किमती खूप वाढल्या.फंड मॅनेजरना एवढी मोठी रक्कम मिळाल्यावर त्यांना रोख रक्कम त्यांच्याकडे ठेवता आली नाही, म्हणून त्यांनी शेअर्स खरेदी केले आणि शेअर्सचे मूल्य खूप महाग झाले .